वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार- सोमवार दि. १३ जानेवारी २०२५ पाने ४ किंमत ३

# जरांगेंच्या डोळ्यांत अश्रू, एसपी काँवत यांची विनंती

## अखेर २ तासांनी धनंजय देशमुख टाकीवरून खाली उतरले

### धनंजय देशमुख यांच्या मागण्या

हत्या आणि खंडणी प्रकरण एकमेकांशी संबंधित असल्याने वाल्मीक कराडवर मकोका लावून, सरपंच हत्या प्रकरणात त्याला सहआरोपी करा, मोकाट कृष्णा आंधळेला अटक करावी, शासकीय वकील म्हणून ॲड. उज्वल निकम किंवा सतीश मानशिंदे यांची नियुक्ती करावी, एसआयटीत पोलिस अधीक्षक पंकज कुमावत यांची नियुक्तती करा, तपासाची माहिती देशमुख कुटुंबीयांना द्या, पोलिस निरीक्षक प्रशांत महाजन याला बडतर्फ करून सहआरोपी करा, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत.

Email:- dailydivyawarta@Gmail.com

दिव्य वार्ता

Email:-editordivyawarta@gmail.com



बीड,(दिव्य न्युज):- पवनचक्की कंपनीला खंडणी मागितल्याप्रकरणी गुन्हा दाखल झालेला आरोपी आणि मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील संशयित वाल्मीक कराड याला तपास यंत्रणांकडून वाचवण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप देशमुख कुटुंबियांसह ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर आज दिवंगत संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी गावातील पाण्याच्या उंच टाकीवर चढून आंदोलन केलं. मागण्या मान्य न झाल्यास टाकीवरून उडी मारण्याचा इशाराही देशमुख यांनी दिला होता. मात्र मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील आणि बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी केलेल्या विनंतीनंतर धनंजय देशमुख यांनी टाकीवरून खाली उतरण्याची तयारी दर्शवली आहे.

धनंजय देशमुख टाकीवर चढून आंदोलन करणार असल्याचे समजताच मनोज जरांगे पाटील हे जालन्यावरून मस्साजोगकडे रवाना झाले होते. मात्र तिथं पोहोचण्याआधीच देशमुख हे पोलिसांना चकवा देऊन आपल्या दोन नातेवाईकांसह पाण्याच्या टाकीवर गेले. तसंच त्यांनी टाकीवर जाताच शिडीही काढून फेकल्याने पोलिसांना वर जाता येत नव्हते. घटनास्थळी पोहोचलेल्या मनोज जरांगे यांनी धनंजय देशमुखांना खाली उतरण्याची विनंती केली. मात्र देशमुख हे आपल्या आंदोलनावर ठाम होते.देशमुख यांना विनवणी करताना मनोज जरांगेंच्या डोळ्यांत अश्रूही तरळले. त्यानंतर काही वेळाने पोलीस अधीक्षक नवनीत काँवत हेदेखील तिथं पोहोचले. तुमच्या मागण्यांवर पोलीस प्रशासन सकारात्मक आहे. मी स्वत: याबाबत सीआयडी आणि एसआयटीच्या प्रमुखांशी बोलतो, असा शब्द काँवत यांनी दिला. दरम्यान, मनोज जरांगे आणि नवनीत काँवत यांच्याकडून वारंवार करण्यात आलेल्या विनंतीनंतर अखेर दोन तासांनी धनंजय देशमुख हे पाण्याच्या टाकीवरून खाली उतरले.

## १२ डिसेंबरला धनंजय मुंडेंच्या बंगल्यावर वाल्मिक कराड अन् पोलीस अधिकाऱ्याची बैठक

### बजरंग सोनवणेंचा खळबळजनक आरोप



बीड : जिल्ह्यातील संतोष देशमुख हत्याकांडावरुन राज्यातील वातावरण तापलं असून मस्साजोग गावात आज धनंजय देशमुख यांनी टीकावर चढून आंदोलन केले. मात्र, मराठा आदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या विनंतीवरुन त्यांनी आपले आंदोलन स्थगित केल्याचं पाहायला मिळालं. दरम्यान, आज या आंदोलनवरुन गावात तणावाचं वातावरण निर्माण झालं होतं. दुसरीकडे बीडचे खासदार बजरंग सोनवणे (इरक्षीरपस ािपुरपश) यांनी बीडमधील पोलीस आणि मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. यापूर्वी आमदार सुरेश धस यांनी खंडणीसाठी वाल्मिक कराड

## वडील गेले; आता संपूर्ण देशमुख कुटुंब संपल्यास यांचे डोळे उघडणार का? वैभवीचा उद्विग्न सवाल



केज : सरपंच संतोष देशमुख यांचे भाऊ धनंजय देशमुख हे आज सकाळपासून मस्साजोग येथील जलकुंभावर चढून आंदोलन करत आहेत. त्यांच्या समर्थनार्थ ग्रामस्थांनी देखील जलकुंभावर चढून आंदोलन सुरू केले आहे. आंदोलनात संतोष देशमुख यांची मुलगी वैभवी सहभागी असून पहिल्यांदाच आक्रमक होत तिने पोलिस, राज्य सरकारवर संताप व्यक्त केला. आजवर आम्ही खूप शांततेत आंदोलन केले पण काहीच हाती लागत नाही. काय तपास सुरू आहे, याची माहिती आम्हाला देण्यात येत नाही, काकाला काय झाले तर कोण जबाबदार? घरातील एक माणूस गेले तर प्रशासन काही करत नाहीत. वडील गेले; आम्ही सर्व गेलो तर यांचे डोळे उघडणार आहेत का? असा उद्विग्न सवाल तिने केला.

## 'देशमुख प्रकरण अतिशय दुर्दैवी, माणुसकीला काळीमा फासणारी ही घटना' – एकनाथ शिंदे



बीड :उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बीडच्या केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणावर प्रतिक्रिया दिली. संतोष देशमुख प्रकरण अतिशय दुर्दैवी आहे. माणुसकीला काळीमा फासणारी ही घटना आहे. अतिशय निर्घृणपणे हत्या झाली आहे. शासनाने हे प्रकरण गांभीर्याने घेतलं आहे. मुख्यमंत्र्यांनी स्वतः सीआयडी, एसआयटी लावलेली आहे. यातील एकही आरोपी सुटणार नाहीत. कोणाशीही लागेबांधे असले तरी सरकार कुणाला पाठीशी घालणार नाही. आरोपींना फाशी सारखी शिक्षा द्यावी, अशी विनंती न्यायालयाकडे केली जाणार आहे. फास्टट्रॅकवर हा खटला चालवला जाणार आहे. भाजप आमदार सुरेश धस यांनी हे प्रकरण फार गांभीर्याने घेतले. एखाद्या सरपंचाची निर्घृण हत्या होते हे अत्यंत दुर्दैवी आहे. संतोष देशमुख प्रकरणात सीआयडी चौकशी चालू आहे. या तपासात कोणीही सुटणार नाही, अशी महत्त्वाची माहिती एकनाथ शिंदे यांनी यावेळी

## दयामाया दाखवू नका; एसआयटी आणि सीआयडी अधिकाऱ्यांना मुख्यमंत्र्यांचा फोन



बीड : बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाला महिना उलटून गेल्यानंतरही या प्रकरणातील संशियत वाल्मीक कराड याच्यावर खुनाचा गुन्हा नोंदवलेला नाही. तसंच हत्या प्रकरणातील आरोपींवर मकोका अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला असला तरी या हत्येशी संबंधित खंडणीच्या गुन्ह्यातील आरोपी असलेल्या वाल्मीक कराडवर मकोका अंतर्गत कारवाईही करण्यात आली नाही. त्यामुळे पोलीस प्रशासनाकडून कराडला वाचवण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप करत दिवंगत संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांनी आज पाण्याच्या टाकीवर चढत आंदोलन केलं. या आंदोलनानंतर आता सरकार दरबारी हालचाली वाढल्या असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एसआयटी प्रमुखांसह सीआयडी पथकाच्या प्रमुखांना फोन करून आरोपींवर

## धनंजय मुंडे मंत्रिपदाचा राजीनामा देणार?

### अजित पवार-अमित शाह यांच्या दिल्लीतील बैठकीत काय घडलं?



बीड: बीडच्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे अडचणीत सापडले आहेत. या हत्याप्रकरणात वाल्मिक कराड यांचं नाव प्रामुख्याने घेतलं जात असून त्यांनी पोलिसांसमोर आत्मसमर्पण केलं आहे. वाल्मिक कराड हे धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय असल्याचा आरोप केला जात आहे. विरोधकांनी मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी जोरकसपणे लावून धरली आहे. त्याचबरोबर पोलीस चौकशीतील कथित अनियमिततेवर प्रश्नचिन्ह उभं केलं आहे. दरम्यान, या हत्याप्रकरणाचा तपास सीआयडी आणि विशेष पथकाकडे सोपवण्यात आला आहे.

## गुन्हेगारापेक्षा अधिकचा दोष

### गुन्हेगारांना वाचवल्यामुळे तुमच्या माथी लागेल-रोहित पवार



बीड : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी देखील प्रशासनाच्या कारभारावर नाराजी व्यक्त केली आहे. रोहित पवार यांनी एक्स या समाजमाध्यमावर याबाबत नाराजी व्यक्त करणारी पोस्ट केली आहे. पवार यांनी त्यांच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे की मस्साजोगचे मयत सरपंच संतोष देशमुख कुटुंबावर आंदोलन करण्याची वेळ येणे हे खूप दुर्दैवी आहे, परभणीच्या सूर्यवंशी कुटुंबाच्या बाबतीतही हीच परिस्थिती आहे. न्याय देणारी व्यवस्थाच आरोपीला वाचवण्याची भूमिका घेत असेल तर

## तिथं हैवानांचा हैदोस, बीडला केंद्रशासित करा

### ठाकरे गटाच्या नेत्याची मोठी मागणी

मुंबई : सरपंच संतोष देशमुख हत्याकांड आणि वाल्मिक कराड याच्या गुन्हेगारीमुळे सध्या राज्याच्या वर्तुळात बीड जिल्ह्याचे नाव चर्चेत आहे. बीडमधील गुन्हेगारी, जातीयवाद, दहशत येथील कायदा सुव्यवस्थेवर विरोधकांकडून सातत्याने प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत. त्यातच ठाकरे गटाचे नेते माजी खासदार विनायक राऊत यांच्या अजब मागणीने सर्वांनाच धक्का बसला आहे.

बीडमधील घटनांवर बोलताना विनायक राऊतांनी बीडला केंद्रशासित प्रदेश करा अशी मागणी केली. राऊत म्हणाले की, देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री आणि गृहमंत्रीही आहेत, ते कोणालाही सोडणार नाही असं सांगतात

## बीड प्रकरणात सरकार अजिबात गंभीर नाही, मुख्यमंत्री अजून राजीनामा घेत नाहीत: प्रणिती शिंदे



बीड : जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणातील आरोपींवर कारवाई करण्याची मागणी राज्यभरातून होत आहे. तर दुसरीकडे संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील संशयित वाल्मीक कराड याला तपास यंत्रणांकडून वाचवण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप देशमुख कुटुंबियांसह ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर दिवंगत संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी गावातील पाण्याच्या उंच टाकीवर चढून आंदोलन केले. याचवेळी तिथे मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलनाचे नेतृत्व करणारे मनोज जरांगे पोहोचले. त्यांनी समजूत काढल्यावर धनंजय देशमुख खाली उतरले. यासंदर्भात मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पुन्हा इशारा दिला आहे. यातच काँग्रेस खासदार प्रणिती शिंदे यांनी यासंदर्भात टीका केली आहे.

विरोधकांनी हे प्रकरणच चांगलेच लावून धरले आहे. या प्रकरणी धनंजय मुंडे यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी सातत्याने केली आहे. विरोधक या मागणीवर ठाम असल्याचे पाहायला मिळत आहेत. सगळी लोकं त्यांच्याविरोधात बोलत आहेत. तरीही काहीही होत नाही. त्या सगळ्या प्रकरणाचे मास्टरमाइंड ते असूनही जर त्यांचे नाव येत नसेल तर त्यांना कुठेतर संरक्षण त्या मंत्रिपदाच आहे. ते फिल्मी स्टाइलने येतात आणि सरेंडर होतात.

## विशाळगड उरुसास परवानगी नाकारली

आंबा , (दिव्य न्युज):- विशाळगडावर आज, रविवारपासून होणाऱ्या उरुसास जिल्हा प्रशासन व पोलिस विभागाने परवानगी नाकारली आहे. ग यारी गडावर – गतिमान झाली होती; पण प्रशासनाने उरूसला परवानगी नाकारली आहे.४ जानेवारीला विशाळगड ग्रामस्थ व कम्युनिस्ट पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी तहसील प्रशासनाला भेट देऊन उरूसला परवानगी देण्याची मागणी केली होती. दरम्यान, दोन दिवसांपूर्वी मंत्री नितेश राणे यांनी सांगली येथील कार्यक्रमात उरूस साजरा करण्यास विरोध दर्शवून आवाज उठवला होता. कोल्हापुरातील हिंदूत्ववादी संघटनांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन अतिक्रमण निर्मूलनाची कार्यवाही पूर्णपणे झाल्याशिवाय गडावर कोणत्याही कार्यक्रमास परवानगी देऊ नये, अशी मागणी लावून धरली होती.

### तातडीने आदेश

पुरातत्व विभाग मुंबईचे संचालक यांनी शुक्रवारी तातडीने काढलेल्या आदेशान्वये ऐतिहासिक वारसा स्थळावर उरूस व उत्सव सुरु करण्यास मनाई केली. त्यानुसार शाहूवाडीचे तहसीलदार रामलिंग चव्हाण यांनी शनिवारी उरुसास मनाई जाहीर केली.

## हाकेंच्या 'त्या' आरोपानंतर जरांगे-पाटील संतापले



बीड, (दिव्य न्युज):- सरपंच संतोष देशमुख यांना न्याय मिळण्यासाठी राज्यात ठिक-ठिकाणी मोर्चे काढण्यात येत आहेत. या मोर्च्यातून संतोष देशमुखांच्या आरोपींना कडक शिक्षा व्हावी, अशी मागणी नेते आणि कुटुंबीयांकडून केली जात आहे. पण, या मोर्चातून एका जातीला लक्ष्य केले जात असल्याचा दावा करत ओबीसी नेते, लक्ष्मण हाके यांच्याकडूनही मोर्चे काढण्यात येत आहेत. पण, या मोर्चानंतर मराठा नेते, मनोज जरांगे-पाटील यांच्या कार्यकर्त्यांकडून धमकीचे फोन असल्याचा आरोप ओबीसी नेते, लक्ष्मण हाके यांनी केला आहे. याला जरांगे-पाटील यांनी मोजक्या शब्दांत उत्तर दिलं आहे.

झालं असं की, सरपंच देशमुख यांच्या हत्येनंतर बीडमधील अनेक अधिकाऱ्यांवर सर्वपक्षीय नेत्यांकडून टीका केली जात आहे. मात्र, एकाच जातीला टार्गेट गेले जात असल्याचा आक्षेप लक्ष्मण हाके यांनी घेतला. मात्र, हाके संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपींचं समर्थन करण्यासाठी हाकेंकडून प्रतिमोर्चे काढत असल्याचं विरोधकांकडून सांगण्यात आलं. यातच आता जरांगे-पाटील यांच्या कार्यकर्त्यांकडून

## जबरी चोरी करणारे चोरटे काही तासांत अटकेत

कडा, (दिव्य न्युज):- जबरी चोरी करून सोन्या चांदीच्या दागिन्यासह रोख रक्कम चोरीला गेल्याचा गुन्हा अंभोरा पोलिसात दाखल होताच पोलिसांनी तपासाचे चक्रे फिरवत अवघ्या सहा तासांत पिंपळा परिसरातून आज (दि. १३) पहाटे तीन चोरट्यांना अटक केली. तर एकजण पसार झाला. विशेष म्हणजे, आरोपींमध्ये तीन सख्खा भावांचा समावेश आहे. यातील एक अल्पवयीन आहे. अनेक गुन्हे अंगावर घेऊन फिरणाऱ्या आरोपींच्या चोरीनंतर अवघ्या काही तासांत मुसक्या



आवळल्याने अंभोरा पोलिसांच्या कामगिरीचे कौतुक होत आहे.

अधिक माहिती अशी कि,आष्टी तालुक्यातील हिवरा येथील बापू मच्छिंद्र लगड यांच्या घरी (दि. १२) जानेवारीच्या मध्यरात्री जबरी चोरी

# ५ लाख घेतले, सावकाराने मुलाचं अपहरण करुन २९ लाख वसूल केले, कोल्हापुरात हादरुन सोडणारी कहाणी!

कोल्हापुर, (दिव्य न्युज):- मुलाचे अपहरण करून २९ लाख रुपये लुटल्याप्रकरणी कोल्हापूर (घेश्रहरीीं उीळाश छ्शुी) जिल्ह्यातील कळे आणि आसगावमधील पाच जणांविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या पाच जणांनी सावकारीमधून हे कृत्य केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. यामुळे कोल्हापुरात एकच खळबळ उडाली आहे.

विठ्ठल पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, कळे येथील अशोक पाटील याच्याकडून फिर्यादी विठ्ठल पाटील यांनी फेब्रुवारी २०२२ साली पाच लाख रुपये घेतले होते. फिर्यादीने अशोक पाटील व त्याचा मुलगा अवधूतला २९ टक्के व्याजदराने एकूण २९ लाख रुपये रोख व ऑनलाईन स्वरूपात परत केले होते. मात्र, पैसे परत केल्यानंतर देखील अशोक पाटील, अवधूत पाटील व प्रल्हाद भोसले यांनी फिर्यादीच्या मुलाचे अपहरण करून आणखी पैशांचा तगादा लावला होता.

या प्रकरणी विठ्ठल पाटील यांनी पोलीस अधीक्षक यांच्याकडे तक्रार अर्ज दिला होता. यानंतर संशयित अशोक पाटील व अवधूत पाटील यांनी २० टक्के व्याजदराने पैसे घेतल्याचे कबूल केले आणि २९ लाख रुपये परत देण्याचे कबूल केले. संशयित अशोक पाटील, प्रदीप भोसले व प्रल्हाद भोसले यांनी फिर्यादीने पोलीस अधीक्षकांकडे दिलेल्या तक्रार अर्जानुसार गुन्हा टाळण्यासाठी फिर्यादीच्या खात्यावर २७ लाख रुपये पाठविले होते. परंतु संशयितांनी फिर्यादींचा मुलगा पियुष याला धमकी देऊन ते परत वसूल केले.

दरम्यान, विठ्ठल आनंदा पाटील यांचे कुटुंबीय सावकाराविरोधात कारवाई होत नसल्याच्या संतापातून काही दिवसापासून कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत आंदोलन सुरू केलं होतं. या आंदोलनानंतर कळे मधील झोपलेल्या पोलीस प्रशासनाने अखेर पाच जणांवर गुन्हा दाखल केला आहे.

# नांगरणी करून जशाच्या तशा जमिनी ४० शेतकऱ्यांना दिल्या जाणार

## इज्तेमासाठी ४०० एकर जमिनीचा वापर, २०० महिलांकडून दिवसभर साफसफाई

पाचोड, (दिव्य न्युज):- रायपूर शिवारातील इज्तेमाच्या चारशेहून अधिक एकर जमिनीची रविवारी (दि. १२) दोन तालुक्यांतील दोनशेहून अधिक मुस्लिम महिलांकडून साफसफाई करण्यात आली.

गंगापूर तालुक्यातील रायपूर शिवारात मागल आठवड्यात ५ जानेवारीला पार पडलेल्या तीनदिवसीय जिल्हास्तरीय तब्लिगी इज्तेमासाठी रायपूर, दिवशी, पिंपळगाव परिसरातील ४० शेतकऱ्यांनी चारशे एकर जमीन दिली होती. शिस्तबद्ध पद्धतीने तब्बल नऊ लाख भाविकांच्या उपस्थितीत दुवाने इज्तेमाची सांगता झाली. आता मंडप तसेच वजुखाने बैतूल खला आरजी मज्जित ऑफिस आदी साहित्य काढण्यात येऊन इज्तेमा स्थळाच्या संपूर्ण जमिनीची रविवारी विशेष म्हणजे खुलताबाद, देवगाव रंगारी, कसाबखेडा, माटेगाव, रायपूर, सावंगी, लासूर स्टेशनसह विविध गावांतील दोनशेहून अधिक मुस्लिम महिलांनी जमिनीवर खराटे मारून साफसफाई केली. आता उद्यापासून जमिनीची नांगरणी करून जशाच्या तशा

विशेष म्हणजे मुस्लिम समाजातील कोणत्याही इज्तेमासाठी महिलांना गोषा परद्याचे बंधन असल्यामुळे त्या येऊ शकत नाहीत. घरातच नमाज पठण इबादत करण्यात मुस्लिम महिलांची नेकी असते. मात्र, नुकतेच रायपूर शिवारात जिल्हास्तरीय तब्लिगी इज्तेमा पार पडला होता. त्यात इज्तेमाच्या तयारीसाठी तब्बल दोन महिने मुस्लिम पुरुष बांधवांनी श्रमदान करण्यासाठी मेहनत घेतली होती. आता त्या जमिनीची साफसफाई रविवारी फक्त महिलांनीच केली.

रविवारी दिवसभर महिलांनी जमिनीची साफसफाई केली. जमिनी करून देण्यात येणार आहेत. रायपूर शिवारातील इज्तेमासाठी दिलेल्या जमिनीची साफसफाई, नांगरणी करून जशाच्या तसे वळण-बांध, काहींचे असलेले तार कुंपण घालून ४० शेतकऱ्यांनी दिलेली जमीन येत्या चार दिवसांत पुन्हा त्यांच्या ताब्यात देणार असल्याचे इज्तेमातील जुम्मेदार कसाबखेडा येथील अब्दुल शेख व कलीम पटेल यांनी रविवारी सांगितले.

पान ४ वरून

## शासकीय औद्योगिक प्रशिक्षण

माणसाची तांत्रिक प्रगती होते मानवाच्या विकासासाठी व देशाच्या विकासासाठी शिक्षण हे अतिशय महत्त्वाचे साधन आहे असे स्वामी विवेकानंद यांनी सांगितलेले आहे त्यामुळे सर्वांनी प्रामाणिकपणे शिक्षण घेऊन त्याचा उपयोग आपली भावी जीवन घडविण्यासाठी केला पाहिजे जिजाऊ मासाहेब यांच्या बद्दल बोलताना त्यांनी सांगितले की छत्रपती शिवरायांना त्यांच्या जीवनात मोलाचे मार्गदर्शन जिजाऊ मासाहेब यांनी केले आजच्या काळातही जिजाऊ माँ साहेबांचे विचार अत्यंत महत्त्वाचे आहेत त्यांनी दिलेले संस्कार नीती मूल्य आणि आदर्श आजही आपल्याला मार्गदर्शन करतात स्त्रियांचा सन्मान करणे अन्यायाविरुद्ध लढणे आणि आपल्या देशासाठी समर्पित असणे ही त्यांची शिकवण आजही महत्त्वाची ठरते यावेळी आष्टी तालुक्यातील इस्त्रोमध्ये कार्यरत श्री प्रशांत वाडेकर व चाकण येथील उद्योजक व संस्थेचे माजी प्रशिक्षणार्थी श्री नितेश कर्डूले यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री मंगेश पवार यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री मिलिंद घुले यांनी केले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे कर्मचारी श्री अनिलआरोळे सौं संगिता नागरगोजे श्री ज्ञानेश्वर दहिफळे श्री सुदर्शन खडबडे श्री रमेश डिडूळ श्री राकेश सानप श्री साईनाथ देवकर श्री अर्शद शेख श्री नेताजी साळवे श्री सुभाष झाडे यांनी परिश्रम घेतले

## जिल्हा परिषदेच्या ६६२

शासनाने बिंदू नामावलीचे पालन करावे असे स्पष्ट निर्देश जिल्हा परिषद बीड यांना दिले होते. हा विषय येथे पुन्हा एकदा सांगण्याचे कारण म्हणजे या सर्व प्रकारानंतर देखील बीड जिल्हा परिषदमध्ये मोठ्या प्रमाणात शिक्षक अतिरिक्त आहेत आणि तरी देखील त्यांच्यावर कोणतीही कारवाई होत नाही आणि हाच विषय सुरेश धस यांनी आता पुन्हा एकदा उचलून धरला आहे. आज घडीला जवळपास साडेसहाशे शिक्षक अतिरिक्त आहेत आणि त्यामुळेच एससी एसटीच्या शिक्षकांवर अन्याय होत असल्याचे बिंदू नामावलीतून दिसून येते. त्यामुळे सुरेश धस यांनी जो यासंबंधी शासन आणि प्रशासनाकडे पाठपुरावा सुरू केला आहे त्यामुळे अनेक शिक्षकांना थंडीत देखील घाम फुटल्याचे पाहायला मिळते. मागील काही दिवसांपासून आमदार सुरेश धस हे प्रचंड आक्रमक झाल्याचे दिसत आहेत. याच आक्रमक पद्धतीने धस वेगवेगळ्या विषयांना देखील हात घालताना पाहायला मिळतात. असाच एका दहा वर्षांपूर्वीच्या विषयात आता आ. सुरेश धस यांनी हात घातला आहे आणि तो विषय म्हणजे बिंदू नामावली. बिंदू नामावलीनुसार शासकीय आणि निमशासकीय संस्थांमध्ये काम चालते त्यामुळे प्रत्येक घटकाला त्याचा अधिकार प्राप्त होतो, याच बिंदु नामावलीनुसार आता बीड जिल्हयात भजडचे ४४८, क चे १०५ भजब चे बारा, आणि वि.जा.अ.९७ शिक्षक अतिरिक्त आहेत.

वापस जाण्याचे सर्व रस्ते बंद झाले ?

एखादा शिक्षक आंतर जिल्हा बदलीने जिल्ह्यात येऊ शकतो मात्र त्यांना वापस पाठवणे हे म्हणावे तेवढे सोपे नाही. त्यामागचे कारण म्हणजे संबंधित शिक्षक ज्या जिल्ह्यातून बीड जिल्ह्यात आलेले आहेत त्या जिल्ह्यात आता जागा शिल्लक नाहीत.

विशेष म्हणजे त्यानंतर झालेल्या शिक्षक भरती मध्ये सर्व जिल्हा परिषदमध्ये शिक्षकांची भरती ही झालेली आहे आणि अशा परिस्थितीत आज घडीला कोणत्याच जिल्ह्यात शिक्षकांच्या रिक्त जागा नाहीत, त्यामुळे वरील सर्व शिक्षक जरी अतिरिक्त झाले असले तरी जिल्ह्याबाहेर जाण्याची त्यांचेसर्व रस्ते आता बंद झाल्याचे दिसून येते.

पूर्ण राज्याची एकच बिंदू नामावली हा एक पर्याय

२०१५ साली जेव्हा सर्वप्रथम विद नामावली चा विषय समोर आला होता तेव्हा अनेक शिक्षण तज्ज्ञांच्या मते संपूर्ण राज्याची शिक्षकांसाठी एकच बिंद नामावली असावी असा विचार समोर आला होता. जर संपूर्ण राज्यासाठी एकच बिंदू नामावली शिक्षक प्रवर्गासाठी तयार केली तरच बीड जिल्ह्यातील हा बिंदू नामावलीचा घोळ मिटू शकतो. अन्यथा यापुढे एनटीसी आणि एनटीडी या दोन्हीही प्रवर्गाचे किमान दहा वर्ष एकही शिक्षक एकतर्फी बदलीने बीड जिल्ह्यात येऊ शकत नाही. मात्र हे सर्व शिक्षक एससी एसटी च्या जागेवर समाविष्ट करण्यात आले आहेत अशी माहिती समोर येत आहे परंतु त्यासाठी देखील बिंदू नामावलीच्या नियमावलीत काय तरतूद आहे हे तपासणे गरजेचे आहे.

## शासनाचे अधिकारी नव्हे

अधिकारी स्वाक्षरी करतात आणि हे अंदाजपत्रक तांत्रीक मान्यता घेवून मंजूर करून घेतात आणि तांत्रिक मंजूरी मिळाल्यानंतर याची प्रशासकीय मान्यता घेतात ज्या ठिकाणचा रस्ता चाळीस लाखात होईल त्या ठिकाणचा अंदाजपत्रक हे ठेकेदार दोन कोटीचा करतात काही ठरावीक पुढाऱ्यांना आणि अधिकाऱ्यांना चार दोन आणेचा कमिशन वाटप करून करोडो रूपयाची निधी हडप करतात असे काहीसे उद्योग बीड शहरात या ठेकेदारांकडून सुरू आहे.

## पुढील अंकात कोणत्या

अंकात देणार आहोत. तीन गठ्ठे आमच्याकडे पुरावे प्राप्त झाले असून ज्या ज्या ठेकदारांनी स्वतःच्या कार्यालयात बसून अंदाजपत्रक तयार केले आणि त्याची तांत्रीक आणि प्रशासकीय मान्यता घेतली त्याची पुराव्यानिशी बातमी पुढील अंकात प्रकाशीत करणार येईल.

## डॉन बनण्यापेक्षा शासकीय ठेकेदार

कारण डॉन बनल्यावर अनेक कुटाने पाठीमागे लागतात सर्वात मोठा कुटाणा म्हणजे पोलिसांचा त्यानंतर संपत्ती कधी जाईल याचा काही नेम नसतो कधी पोलिस इंकाउंटर करेल किंवा जेलमध्ये टाकेल सांगताच येत नाही. म्हणून ठेकेदार झालेला बरा ठेकदार झाल्यानंतर ना पोलिसांची भिती ना शासनाची भिती ना अन्य कोणाची भिती खुलेआम ठरावीक लोकांना कमिशन वाटायचे आणि थातूरमातूर काम करत हजारों करोड रूपये शासनाच्या अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने चेक किंवा आरटीजिएसच्या माध्यमातून उचलायचा कोणाची ही दाद ना फिरयाद मस्त आपला घर भरायचा असेच काहीचे प्रकार बीड मधील बीडशहराच्या विकासासाठी आलेल्या निधीतून बोगसगिरी करत करोडो रूपयांच्या निधीवर डल्ला मारणाऱ्या ठेकेदारांवार आता कारवाई करणे गजेचे असून दीड शे ते दोनशे कोटी रूपये येवून ही शहराच्या रस्त्याची आवस्था बिकट असून याबाबत आमच्याकडे तीन गठ्ठे पुरावे असून त्या पुराव्यानिशी आमही लवकरच कोणत्या ठेकेदारांनी कोणते काम केले याची सविस्तर बातमी पुढील अंकात देणार आहोत.

पान १ वरून

## १२ डिसेंबरला धनंजय मुंडेंच्या

आणि कंपनीच्या अधिकाऱ्यांची मंत्री धनंजय मुंडेंच्या (उ्हरपरपक्षरू ीींपवश) बंगल्यावर बैठक झाल्याचा आरोप केला होता. आता, बजरं सोनवणे यांनीही धनंजय मुंडेंच्या बंगल्यावर वाल्मिक कराड व पोलीस अधिकाऱ्याची बैठक झाल्याचा गंभीर आरोप केला आहे. विशेष म्हणजे खूनप्रकरण आणि खंडणीचा गुन्हा दाखल झाल्यानंतर ही बैठक झाल्याचंही त्यांनी म्हटलं आहे.

बीड प्रकरणावरुन खासदार बजरंग सोनवणे यांनी थेट मंत्री धनंजय मुंडेंचं नाव घेत गंभीर आरोप केले आहेत. मस्साजोग सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडानंतर मी पहिल्याच बाईटमध्ये मीडियाला म्हटलं होतं की, तिसऱ्या आरोपींचं कनेक्शन धाराशिवमार्गे पुण्याला लागतंय का बघा, कारण माझ्या बोलण्यामागे काही लॉजिक होतं. आज हा आरोपी धाराशिवमार्गे पुण्याला गेल्याचं सापडलं. खंडणीतील आरोपी पुण्याला सरेंडर होतो, तो म्हणतो मी इकडं गेलो, तिकडं गेलो. खंडणीच्या आरोपीवर ११ तारखेला गुन्हा दाखल झाला. मात्र, १२ तारखेला बीड जिल्ह्याचे माजी पालकमंत्री, खंडणीतील आरोपी आणि पोलीस अधिकारी यांची बैठक झाली. माजी पालकमंत्र्यांच्या बंगल्यावर, त्यांच्या ऑफिसमध्ये खंडणीतील आरोपी अन् पोलीस अधिकारी यांची भेट झाली. म्हणजे, पोलिसाला तिथं मध्ये बसवून तो निघून गेला का? असा सवाल बजरंग सोनवणेंनी उपस्थित केला. विशेष म्हणजे बजरंग सोनवणेंनी थेट नाव घेतलं नसलं तरी बीडचे माजी पालकंमंत्री म्हणत थेट धनजंय मुंडेंवरच गंभीर आरोप केले आहेत.

१२ डिसेंबरला बीडचे पालकमंत्री व खंडणीखोर आरोपीची पोलिस अधिकाऱ्यासोबत बैठक झाली. विशेष म्हणजे वाल्मिक कराडला पोलिसांची सुरक्षा आहे, तो कुठल्या पदावर आहे हे मला माहिती नाही. पण, त्यांनाही पोलीस गार्ड आहेत, हे गार्ड आरोपीसोबत कसे काय? असे सवाल बजरंग सोनवणे यांनी उपस्थित केला आहे. ११ डिसेंबर रोजी खंडणीचा गुन्हा दाखल झाला, तेव्हापासून आरोपीला कोणी-कोणी मदत केली. ३१ डिसेंबरला अटक होईपर्यंत २१ दिवस आरोपीला ज्यांनी मदत केली, त्यांना सह-आरोपी का केलं जात नाही, असेही सोनवणेंनी म्हटलं आहे.

एसआयटीतील नावेही आरोपीच्या सांगण्यावरुन

एसआयटी कधी नेमली गेली हेही तुम्ही पाहा, ज्या दिवशी आरोपी पोलिसांना शरण येतो. त्याच दिवशी एसायटी गठीत केली जाते, एसआयटीच्या टीमची नावे समोर येतात. म्हणजे, आरोपीला जे हवे ते पोलीस अधिकारी, कर्मचारी एसआयटीमध्ये घेतले गेले. राज्यपालांकडून एसआयटीतील अधिकाऱ्यांची नावे निश्चित केल्यानंतरच आरोपी पोलिसांना अटक झाला, असा गंभीर आरोप खासदार सोनवणेंनी केला आहे.

## वडील गेले; आता संपूर्ण

आम्हाला न्याय पाहिजे, वाल्मीक कराडवर मकोका लावा, फरार आरोपीस तत्काळ अटक करा, अशा जोरदार घोषणाबाजीने मस्साजोग येथील आंदोलन स्थळ परिसर दणाणून गेला आहे. यामुळे मस्साजोग येथे वातावरण तापले आहे. दरम्यान, मराठा आरक्षण नेते मनोज जरांगे यांनी देशमुख यांना खाली उतरण्याची विनंती केली. तसेच जरांगे यांच्या विनंतीवरून धनंजय देशमुख हे जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कांवत यांच्यासोबत फोनवर बोलले. यावेळी पोलीस अधीक्षकांनी धनंजय देशमुख यांना तुम्हाला सर्व समजावून सांगतो. तुम्ही खाली या, प्रशासनाचा आणि तपास करणाऱ्या यंत्रणाचा प्रतिनिधी येथे येईल अशी माहिती त्यांनी दिली.

दरम्यान, मनोज जरांगे यांना बोलताना धनंजय देशमुख यांनी पोलीस अधीक्षक सहकार्य करत आहेत मात्र एसआयटी, सीआयडी यांच्याकडून कसल्याही प्रकारचे सहकार्य होत नाही. तपास कुठपर्यंत आला याची माहिती दिली जात नाही असा आरोप केला. दरम्यान, धनंजय देशमुख पोलिस अधीक्षक यांच्या आश्वासनानंतर तब्बल दोन तासांच्या आंदोलनानंतर जलकुंभावरून खाली उतरले आहेत.

आंदोलनस्थळी अग्निशमन दाखल

ग्रामस्थांनी जलकुंभखाली ठिय्या दिला आहे. तसेच काही ग्रामस्थ पायऱ्यावर चढले. धनंजय देशमुख यांनी शिडी काढून घेतल्याने पोलीसवर जाण्यात असमर्थ ठरले त्यामुळे अग्निशामन दल गाडी येथे दाखल झाली आहे त्यांच्या शिर्डी ने धनंजय देशमुख यांना खाली आणण्यात येईल किंवा पोलीस अधीक्षक वर जाऊन त्यांच्याशी चर्चा करतील अशी चर्चा अशी शक्यता आहे.

## दयामाया दाखवू नका;

कठोर कारवाई सूचना दिल्याचे समजते.

सरपंच हत्या प्रकरणातील एकही आरोपी सुटता कामा नये. कोणावरही दयामाया दाखवू नका. आरोपींवर कठोर कारवाई करा, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलीस अधिकाऱ्यांना फोनवर दिल्याची माहिती आहे. तसंच या प्रकरणातील तपासाचाही मुख्यमंत्र्यांकडून आढावा घेण्यात आल्याचं सांगितलं जात आहे.दरम्यान, मुख्यमंत्री फडणवीस यांच्या या सूचनांनंतर आता वाल्मीक कराडभोवतीचा कारवाईचा फास आवळला जाणार का, हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

आजवर आम्ही खूप शांततेत आंदोलन केले पण काहीच हाती लागत नाही. काय तपास सुरू आहे, याची माहिती आम्हाला देण्यात येत नाही, काकाला काय झाले तर कोण जबाबदार? घरातील एक माणूस गेले तर प्रशासन काही करत नाहीत. वडील गेले; आम्ही सर्व गेलो तर यांचे डोळे उघडणार आहेत का? असा उद्विग्न सवाल सरपंच संतोष देशमुख यांची कन्या वैभवी देशमुख हिने उपस्थित केला आहे.

## ‘देशमुख प्रकरण अतिशय

दिली.

खासदार संजय राऊत यांनी आमचा कम्युनिकेशन गॅप झाला. त्यामुळे आधीची युती तुटली असं विधान केलं होतं. यावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रत्युत्तर देत त्यांना आता आठवण झाली का? असा सवाल केला. बैल गेला आणि झोपा केल्या अशी अवस्था झाली आहे. तेलही गेलं आहे आणि तूपही गेलं आहे. पुढचं मी काही बोलत नाही. उपरती लवकर सुचली. २०१९ च्या निवडणुकीमध्ये राज्यातील जनतेने क्लिअर माईंडेड मतदान केलं होतं. पण काहींनी स्वार्थासाठी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे विचार सोडले. त्यांना स्मारकाकडे निमंत्रण देणार नाही. स्मारक हे शासन बनवत आहे. बाळासाहेब हे एकट्याचे नाहीत. लोकनेते म्हणून या संपूर्ण महाराष्ट्रासाठी त्यांचे धोरण होते. ज्यांनी त्यांचे विचार सोडले त्यांना विधानसभेमध्ये लोकांनी धडा शिकवला. आता काय बोलून त्याचा उपयोग. जो बुंद से गई वो हौद से नही आती, अशी टीका एकनाथ शिंदे यांनी केली.

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे सोबत आले तर स्वागत करू, असं भाजप नेते म्हणत आहेत. यावर एकनाथ शिंदे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचं शिर्डीतील भाषण ऐकण्याचा सल्ला दिला. प्रत्येक जण काम करणारे मंत्री आहेत. हे मंत्री फेसबुकवाले नाहीत. मागील अडीच वर्षात महाविकास आघाडीने थांबवलेले प्रकल्प आम्ही मार्गी लावले. तुम्ही सर्वजण साक्षीदार आहात. एवढे निर्णय कधी झाले आहेत का? ही सर्व महायुतीच्या कामाची पोचपावती आहे, असं एकनाथ शिंदे म्हणाले.

## बीड प्रकरणात सरकार

याचा अर्थ कुठेतरी संरक्षण आहे, हा तपास पूर्ण होईपर्यंत धनंजय मुंडे यांनी मंत्रिपदाचा राजीनामा देऊन पदापासून दूर व्हावे, असे शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी म्हटले आहे. पत्रकारांशी बोलताना प्रणिती शिंदे यांनी सरकारवर टीका केली.

सरकार या बाबतीत अजिबात गंभीर नाही. बीड,परभणीमध्ये दररोज नवे पैलू दिसून येत असून नवीन माहिती समोर येत आहे. तरीही मुख्यमंत्री याबाबतीत गंभीर नाही. या प्रकरणी धनंजय मुंडे यांनी राजीनामा दिला पाहिजे. मात्र, मुख्यमंत्री तो ही घेत नाहीत. त्यामुळे एकंदरीत हे सरकार निगरगट्ट झाले आहे, असे दिसून येत आहे. सुरेश धस अस म्हणाले की, जनावराला असे मारले तर अंगावर शहारे येतात, हे तर माणसाला मारत आहेत आणि हे अस बीड जिल्ह्यात पहिल्यांदा झाले नाही. बीड जिल्हा हा अशा गोष्टींसाठी प्रसिद्ध आहे. आत्तापर्यंत हे सगळे प्रकरण झाकले गेले मात्र आता त्यांना हे भोगावे लागणार असल्याची टीका प्रणिती शिंदे यांनी केली.

## तिथं हैवानांचा हैदोस,

परंतु गुंडांना पायबंदही घालत नाही. अशात जर बीड वासियांचे जीवन सुरळीत चालवायचं असेल, इथल्या लोकप्रतिनिधींना काम करण्यासाठी चांगले वातावरण करायचे असेल तर बीडमधील संपूर्ण शासन व्यवस्था केंद्रशासित करण्याची गरज आहे असं त्यांनी सांगितले.

त्याशिवाय बीड जिल्ह्यात हैवानांचा हैदोस सुरू आहे. पोलीस प्रशासन त्यावर आळा घालण्यास अयशस्वी ठरलं आहे. बीडला थेट केंद्रातून शासन निर्माण करण्याची आवश्यकता आहे तरच बीडला शांतता आणि सुव्यवस्था नांदेल. अन्यथा लोकप्रतिनिधी आणि सरपंचाचे अनेक बळी तिथे जाण्याची शक्यता आहे अशी भीतीही माजी खासदार विनायक राऊत यांनी व्यक्त केली.

दरम्यान, सरपंच हत्याकांड प्रकरणी सरकार अजिबात गंभीर नाही. बीड,परभणीमध्ये रोज नवेनवे पैलू दिसून येत असून नवीन माहिती समोर येत आहे तरीही मुख्यमंत्री गंभीर नाहीत. धनंजय मुंडेंनी राजीनामा दिला पाहिजे, मात्र तो ही सरकार घेत नाहीत. त्यामुळे एकंदरीत हे सरकार निगरगठ्ठ झाल्याचं दिसून येते. ज्या क्रूर पद्धतीने देशमुख यांना चार तास मारलं गेलं त्याचा मी निषेध करते. जनावराला अस मारलं तर अंगावर शहारे येतात, हे तर माणसाला मारत आहेत असं सुरेश धस अस म्हणाले होते आणि हे असं बीड जिल्ह्यात पहिल्यांदा झालं नाही, बीड जिल्हा हा अशा गोष्टींसाठी प्रसिद्ध आहे. आत्तापर्यंत हे सगळे प्रकरण झाकले गेले मात्र आता त्यांना हे भोगावं लागणार असून त्यांना अटक झालीच पाहिजे अशी मागणी खासदार प्रणिती शिंदे यांनी केली.

संतोष देशमुख हत्या प्रकरणी न्याय मिळावा आणि दोषींना अटक करावी अशी मागणी करत दिवंगत संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी गावातील पाण्याच्या उंच टाकीवर चढून आंदोलन केलं. जवळपास २ तासांनी धनंजय देशमुख खाली उतरले मात्र तोपर्यंत सर्व ग्रामस्थ, मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील आणि पोलीस अधीक्षक यांनी एकत्रित जमून धनंजय देशमुखांना टाकीवरून खाली उतरण्याची विनवणी केली होती. संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा तपास पूर्ण होईपर्यंत धनंजय मुंडे यांनी मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा अशी मागणी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार संदीप श्रीरसागर यांनी केली.

## गुन्हेगारापेक्षा अधिकचा दोष

देशमुख कुटुंबाकडे आंदोलनाशिवाय दुसरा पर्याय काय आहे? हे सरकारनेच सांगावं.

रोहित पवार म्हणाले, राज्यभरातील नागरिकांच्या भावना तीव्र असताना, आरोपी कोण, सूत्रधार कोण, तपास कसा होतोय हे सर्वांना माहित असतानाही सरकार केवळ राजकीय तडजोडीसाठी भूमिका घेत नसेल तर याहून मोठं दुर्दैव काय असू शकतं? राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आता गुळगुळीत, मिळमिळीत भूमिका घेण्यापेक्षा कठोर भूमिका घेणे गरजेचे आहे. या घटनेत दोषींना शिक्षा देण्यात सरकार अपूर्ण पडलं तर इतिहास तुम्हाला कधी माफ तर करणारच नाही शिवाय गुन्हेगारापेक्षा अधिकचा दोष गुन्हेगारांना वाचवल्यामुळे तुमच्या माथी लागेल हेही लक्षात असू द्या.

## हाकेंच्या ‘त्या’ आरोपानंतर

धमकीचे फोन येत असल्याचा आरोप लक्ष्मण हाके यांनी केला आहे.

जीवे मारण्याच्या धमक्या नित्याच्याच झाल्या आहेत. मी कुठेही आरोपींचं समर्थन केले नाही. एका जातीला तुम्ही आरोपी ठरवू नका, शिक्षकांचा काय संबंध? असं मी बोलल्यानंतर रोज मला जीवे मारण्याच्या धमकीचे कॉल केले जात आहे. माझ्या कारला कट मारला जातो. कारच्या आडवे लोक येतात. एखाद्या हॉटेलमध्ये मी चहा प्यायला बसल्यावर तिथे माणसे गोळा होतात. सामाजिक न्यायाची भूमिका घेताना लोक, असं बोलत असतील, तर याची दखल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घ्यावी, अशी मागणी लक्ष्मण हाके यांनी केली.

जा तिडके म्हणावे

याबद्दल जरांगे-पाटील यांना एका प्रसारमाध्यमाच्या प्रतिनिधीनं प्रश्न विचारला. मात्र, त्यांनी झिडगारून लावलं आहे. जरांगे-पाटील यांच्या कार्यकर्त्यांनी मला जीवे मारण्याची धमकी दिली, असा आरोप हाकेंनी केलाय असं विचारल्यावर जरांगे-पाटील म्हणाले, जा तिकडे म्हणाव भिकार सा****** एवढीच प्रतिक्रिया जरांगे-पाटील यांनी दिली आहे.

## जबरी चोरी करणारे

करून घरातील सोन्या चांदीच्या दागिन्यासह रोख रक्कम चोरीला गेल्याची घटना घडली होती. अंभोरा पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध त्याच रात्री गुन्हा दाखल करण्यात आला. घटनेचे गांभीर्य लक्षात घेत पोलिसांनी तपास सुरू केला. गुप्तवार्तावरून पिंपळा परिसरात सापळा लावला. सोमवारी पहाटे पोलिसांना तीन चोरटे हाती लागले तर एकजण पसार झाला. आरोपींमध्ये तीन सख्खा भावांचा समावेश असून एक भाऊ अल्पवयीन आहे. ही कामगिरी पोलिस अधीक्षक नवनवीन कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, आष्टीचे उपअधीक्षक बाळकृष्ण हानपुडे याच्या मार्गदर्शनाखाली अंभोरा ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे, पोलीस हवालदार बाबासाहेब गर्जे, मनोजकुमार खंडागळे, बाबुराव तांदळे, लुईस पवार, पोलीस अंमलदार शिवदास केदार, सुदाम पैठणे, अमोल शिरसाट, वाहन चालक प्रकाश पडवळ यांनी केली.